**तक्रार निवारण समिति, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर**

**तक्रार अर्ज क्रं २६/२०१८**

१.श्री. अण्णासाहेब सदाशिव मगर } तक्रार अर्जदार

विरूध्द

१.विद्या प्रसारक मंडळ, गडहिंग्लज, कोल्हापूर } वि. प
२.डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जिल्हाः कोल्हापूर

विद्या प्रसारक मंडळ, गडहिंग्लज, कोल्हापूर या संस्थेच्या डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज येथील श्री. अण्णासाहेब सदाशिव मगर सहायक प्राध्यापक, प्राणीशास्त्र यांनी दि. १६/०८/२०१६ रोजी नियुक्ती दिनांकापासून वेतन मिळणेकरिता तक्रार अर्ज दाखल केला आहे

**तक्रारीचे स्वरूप :**

श्री. अण्णासाहेब सदाशिव मगर यांनी आपल्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे नमुद केले आहे की, त्यांची

०८/०१/१९९६ —नियुक्ती दिनांक.

२०/०६/१९९६ — संस्था व महाविद्यालय यांनी सेवेतून कमी केले.

०६/०२/१९९८ — मा. पिठासन अधिकारी, पुणे यांचा आदेश.
१५/०७/१९९८ — मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल.

१३/०८/२०१० — प्रकरण पुणे न्यायाधिकरणाकडे पाठविले.

१२/०२/२०१२ — मे. पुणे न्यायाधिकरणाचा सेवेत रूजू करून घेण्याचा आदेश.

०४/०२/२०१३ — पुन:श्च सेवेमध्ये हजर.

उपरोक्त नियुक्ती तारखेपासून पुन:श्च सेवेमध्ये हजर होण्याच्या तारखेपर्यंत वेतन न मिळालेबाबतची तक्रार.

दि. २७/०८/२०१८ रोजी तक्रारदार श्री. अण्णासाहेब सदाशिव मगर यांना सुनावणी नोटीस देवूनही सुनावणी दिवशी गैरहजर, संस्थेतर्फे सचिव आणि महाविद्यालयांतर्फे प्राचार्य डॉ. एम. आर. पाटील हजर होते.

संस्थेतर्फे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी समितीसमोर न्यायालयीन प्रकरणांची कागदपत्रे सादर केली. मा. पिठासन अधिकारी न्यायाधिकरण पुणे यांनी अपिल क्र. २८/१९९७ वर दि. १२/१२/२०१२ रोजी यांनी दिलेल्या आदेशामधील खालील मजकूर समितीसमोर दाखविला.

**ORDER**

Impugned order of termination dated 19/05/1997 is hereby quashed and set aside with direction to Respondent No. 1 & 2 to reinstate the appellant in the original post within two months. Claims for back wages since given up by the appellant, it is disallowed. Appeal is accordingly disposed off, with no order as to costs.

तसेच मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे वेतन मान्यतेकरिता ११ पत्रे सादर केलेली होती. ती जोडपत्रे ३ नुसार जोडलेली आहेत. त्यानंतर मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी दि. ३१/०८/२०१६ रोजी श्री. अण्णासाहेब सदाशिव मगर यांचे मान्यता व वेतन देण्यास अपात्र ठरल्याचे पत्र मिळाले. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी वेतन

नाकारल्याने व विद्यापीठाची मान्यता मिळत नसल्यामुळे श्री. अण्णासाहेब सदाशिव मगर यांना दि. ०७/०९/२०१६ रोजी सेवेतून कमी करण्यात आले. पुढे संस्थेने व महाविद्यालयाने पुणे ट्रॅब्युनल येथील निर्णयाच्या विरोधात उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल केली आहे. त्याचा याचिका क्रमांक ३६०२/२०१८ असा आहे. सदर अपील प्रलंबित आहे.

उपरोक्त वस्तूस्थिती समितीच्या निर्देशनास आल्याने समितीने खालीलप्रमाणे आदेश पारित केले.

**आदेश —**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्रमांक. ३६०२/२०१८ ही सद्य स्थितीत प्रलंबित असले कारणाने सदरची बाब ही न्यायप्रविष्ठ आहे. या कारणास्तव तक्रारदार यांचा तक्रार अर्ज या समितीसमोर चालणेस पात्र नाही.

वरील प्रमाणे झालेल्या निर्णयाची प्रत देवून संबंधित तक्रारदार, संस्था आणि महाविद्यालय यांना कळविण्यात यावे.

दि. २५/०९/२०१८

**अध्यक्ष**

**सदस्य** **सदस्य**

**सदस्य** **सदस्य सचिव**